**हे करा**

1. आपला एटीएम व्यवहार संपूर्ण गुप्ततेमध्ये करा, आपला वैयक्तिक ओळख क्रमांक (पिन) प्रविष्ट करत असताना कोणालाही पाहू देऊ नका.
2. व्यवहार पूर्ण झाल्यानंतर एटीएमच्या स्क्रीनवर स्वागताची स्क्रीन दिसत असल्याची खात्री करा.
3. आपला वर्तमान मोबाइल क्रमांक बँकेमध्ये नोंदवल्याची खात्री करा जेणेकरून तुमच्या सर्व व्यवहारांच्या सूचना तुम्हाला मिळू शकतात.
4. एटीएमच्या आसपास लोकांच्या संशयास्पद हालचालींपासून किंवा तुम्हाला संभाषणात गुंतवण्याचा प्रयत्न करणाऱ्या अनोळखी लोकांपासून सावध रहा.
5. व्यवहार पूर्ण झाल्यानंतर दुकानदाराने तुम्हाला दिलेले कार्ड तुमचे कार्ड आहे किंवा नाही हे तपासा.
6. एटीएम/डेबिट कार्ड हरवल्यास किंवा चोरीला गेल्यास ताबडतोब बँकेला कळवा. कोणताही अनधिकृत व्यवहार झाला असल्यास कळवा.
7. व्यवहाराच्या सूचनेचे एसएमएस आणि बँक स्टेटमेंट नियमितपणे तपासा.
8. जर एटीएममधून रोख रक्कम बाहेर येत नाही आणि एटीएम वर "रोख संपली आहे" दर्शवलेले नाही तर कृपया नोटीस बोर्डावर नमूद केलेल्या क्रमांकावर बँकेला कळवा.
9. खात्यातून कापलेल्या रक्कमेच्या एसएमएस साठी ताबडतोब आपला फोन तपासा.
10. तुम्हाला तुमचे कार्ड मिळाल्यावर लगेच कार्डाच्या मागील पट्टीवर सही करा.
11. आपला पिन पाठ करा आणि पिनचे सर्व वास्तविक पुरावे नष्ट करा.
12. कृपया पिन लक्षात ठेवल्यावर तुम्हाला मिळालेले पिन मेलर नष्ट करा.
13. तुम्हाला पिन मिळाल्यावर तो नेहमी लगेच बदला.
14. पिन नेहमी नियमितपणे, शक्यतो तीन महिन्यातून एकदा बदला.
15. कार्डचा पहिला वापर एटीएमवर झाला पाहिजे, अन्यथा ते पॉइंट ऑफ सेल (पीओएस) टर्मिनलवर स्वीकारले जाणार नाही.
16. आपल्या एटीएम व्यवहारांच्या एसएमएस द्वारे सूचना मिळण्यासाठी आपला मोबाइल क्रमांक बँकेमध्ये नोंदवा.
17. खात्यात कोणताही अनधिकृत कार्ड व्यवहार निदर्शनास आल्यास त्याविषयी ताबडतोब बँकेमध्ये कळवले गेले पाहिजे. जर तुमचे डेबिट कार्ड वापरून फसवणूकीने पैसे काढले जात असल्यास यामुळे तुम्हाला मदत होईल.
18. आपले कार्ड एखाद्या सुरक्षित ठिकाणी ठेवा जेथून ते गहाळ झाल्यास तुम्हाला ताबडतोब कळेल.
19. आपले एटीएम कार्ड रोख रक्कम असल्यासारखे सुरक्षित ठेवा आणि सुरक्षित ताबा निश्चित करा.
20. एटीएम-कम-डेबिट कार्ड काळजीपूर्वक ठेवा जेणेकरून त्यावरील चुंबकीय पट्टी खराब होणार नाही.
21. तुम्ही एटीएममध्ये जाण्याआधी आसपास संशयास्पद दिसणारे व्यक्ती आहेत की नाही हे तपासा. तुम्हाला सुरक्षित वाटत नसल्यास एटीएम मधून ताबडतोब बाहेर पडा.
22. तुम्ही एटीएम व्यवहार सुरु केल्यानंतर तुम्हाला काहीही संशयास्पद आढळते किंवा इतर कोणतीही समस्या उद्भवते, तर तुम्ही व्यवहार रद्द करून निघू शकता.
23. आपल्या मागून "खांद्यावरून पाहणाऱ्या" व्यक्तीपासून सावध रहा. पिन प्रविष्ट करताना आपल्या शरीराचा उपयोग करून कीपॅड झाकून, निरीक्षण करणाऱ्या लोकांपासून आपला पिन लपवा.
24. व्यवहार केल्यानंतर आपले कार्ड आणि आपली पावती घेतल्याची खात्री करा आणि त्यानंतर ताबडतोब बाहेर पडा.
25. तुम्ही तुमचा व्यवहार पूर्ण केल्यावर, एटीएम सोडण्याआधी, एटीएमवर 'स्वागत स्क्रीन' प्रदर्शित झाल्याची आणि ती स्क्रोल होत असल्याची खात्री करा.
26. पासबुकमधील नोंदी अचूक असल्याची खात्री करण्यासाठी वेळोवेळी त्याची पडताळणी करा. कोणताही अनधिकृत कार्ड व्यवहार निदर्शनास आल्यास त्याविषयी ताबडतोब बँकेमध्ये कळवले गेले पाहिजे.
27. पॉइंट ऑफ सेल (पीओएस) ठिकाणी तुमच्या उपस्थितीमध्ये कार्ड स्वाइप केल्याची कृपया खात्री करा.
28. आपले एटीएम/ डेबिट कार्ड हरवल्यास किंवा चोरीला गेल्यास, कार्ड ताबडतोब हॉटलिस्ट करा. डेबिट कार्ड हॉट लिस्ट करण्यासाठी कृपया हेल्पलाइन क्रमांक - 1800 1200 1200 वर कॉल करा किंवा जवळच्या शाखेमध्ये भेट द्या.
29. जेव्हा तुम्ही कार्डची कालावधीची समाप्ती झाल्यावर किंवा तुमचे खाते बंद केल्यावर तुमचे कार्ड नष्ट करता, ते चुंबकीय पट्टीतून कापून त्याचे चार तुकडे करा.
30. एटीएमला कोणतेही अतिरिक्त उपकरण जोडलेले आहे का हे तपासा. हे तुमचा डेटा गोळा करण्यासाठी लावलेले असू शकते. असे कोणतेही उपकरण आढळल्यास ताबडतोब सुरक्षारक्षकाला/बँकेला कळवा.

**हे करू नका**

1. आपला पिन कार्डवर लिहू नका, आपला पिन लक्षात ठेवा.
2. कोणत्याही अनोळखी व्यक्तीकडून मदत घेऊ नका किंवा आपले कार्ड वापरण्यासाठी कोणालाही देऊ नका.

3. बँकेचे कर्मचारी आणि कुटुंबातील सदस्यांसह, कोणालाही आपला पिन सांगू नका.
4. तुम्ही पैसे भरणा करत असताना, कार्ड तुमच्या नजरेआड होऊ देऊ नका.
5. तुम्ही व्यवहार करत असताना मोबाइल फोनवर बोलणे टाळा.
6. आपले कार्ड कधीही कोणालाही देऊ नका, अगदी आपल्या जवळच्या नातेवाईक/मित्राला/मैत्रिणीला किंवा कोणी बँकेचे प्रतिनिधीत्व करण्याचा दावा करत असला तरीही.
7. आपला पिन कधीही आपल्या पाकिटात किंवा पर्समध्ये ठेवू नका.
8. तुम्ही आपला पिन प्रविष्ट करताना कोणालाही पाहू देऊ नका.
9. असा पिन कधीच वापरू नका ज्याचा सहजपणे अंदाज लावता येऊ शकतो जसे तुमचा जन्मदिवस किंवा टेलिफोन क्रमांक.
10. आपले कार्ड कधीच एटीएम मध्ये सोडू नका.
11. आपले कार्ड कधीच दुर्लक्षितपणे सोडू नका, जसे कार मध्ये, हॉटेल रूम मध्ये, किंवा कामावर किंवा दुकानात.
12. इलेक्ट्रॉनिक पॉइंट-ऑफ-सेल स्वाइप टर्मिनल्स नसलेल्या दुकानांमध्ये/ व्यापारी आस्थापनांमध्ये आपले डेबिट कार्ड वापरण्याचा प्रयत्न करू नका.
13. पिन मेलरवर घासू नका. पिन सहजपणे पाहण्याकरीता लिफाफा उघडण्यासाठी ते किनाऱ्याकडून फाडा.
14. तुमच्या एटीएम पिनची मागणी करणाऱ्या बँकेद्वारे जारी केल्याचा दावा करणाऱ्या कोणत्याही ई-मेलला उत्तर देऊ नका. हे फिशिंगचे प्रयत्न असू शकतात. एयू स्मॉल फायनांस बँकेमध्ये, आम्ही आमच्यावरील विश्वासाचा आदर करतो आणि कोणत्याही उद्देश्यासाठी पिन इत्यादी सारखे वैयक्तिक तपशील कधीच विचारणार नाही.
15. अशा कोणत्याही एटीएम मध्ये आपल्या पिन संदर्भातील माहिती देऊ नका जे खरे वाटत नाही किंवा ज्यामध्ये बदल केलेला वाटतो / ज्याला संशयास्पद उपकरण जोडलेले आहे/ जे संशयास्पत पद्धतीने चालवले जात आहे.
16. आपली रोख रक्कम दाखवू नका, रोख मोजू नका, ती सुरक्षितपणे आपल्या खिशात ठेवा आणि एटीएममधून बाहेर पडा.
17. एटीएम वापरताना कोणाकडूनही किंवा सुरक्षारक्षकाकडून मदत स्वीकारू नका.

**एयू बँक एटीएममधून रोख रक्कम काढणे :- एटीएम संबंधित तक्रार करण्यासाठी माहिती**

1. <u>एयू बँकेचे ग्राहक नसलेल्या सर्वांसाठी :-</u> आम्ही "एयू बँकेचे ग्राहक नसलेल्या" सर्वांना विनंती करतो कि, एटीएम व्यवहार अयशस्वी झाल्यास, त्यांनी बँकेच्या शाखेमध्ये तक्रार करायची आहे जेथे त्यांचे खाते आहे आणि सदर एटीएम कार्ड ज्यासोबत संलग्न आहे.

2. <u>सर्व एयू बँक ग्राहकांसाठी :-</u> आम्ही सर्व "एयू बँक ग्राहकांना" विनंती करतो कि, एटीएम व्यवहार अयशस्वी झाल्यास, त्यांनी बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये तक्रार करायची आहे. त्याचप्रमाणे दिलेल्या फोन बँकिंग क्रमांक :- **1800 1200 1200** वर मदत मागून तक्रार नोंदवण्यासाठी ग्राहक एयू बँक ग्राहक सेवेला संपर्क करू शकतात.

## सदर एटीएम साइट __________________________ श्रेणी अंतर्गत येते.

## सूचना :- हा परिसर सीसीटीव्हीच्या निगराणीखाली आहे.

## <u>रोख परत घेणे :-</u> कृपया एटीएममधून निघालेली रोख रक्कम घेतल्याची खात्री करा कारण एटीएमद्वारे रोख रक्कम परत घेणे बंद केले आहे.

<u>रोख पैसे काढण्यासाठी एयू बँक एटीएममध्ये सर्व प्रमुख प्रकारची कार्डे वापरली जाऊ शकतात.</u>